



* खालील पर्यायातून वाक्प्रचारांचा अर्थ शोधून योग्य पर्यायाचा गोल रंगवा.

**१) नवल वाटणे –**

१) आनंद वाटणे ◯  २) मज्जा वाटणे ◯  ३) आश्चर्य वाटणे ◯  ४) भिती वाटणे ◯

**२) काटकसर करणे –**

१) बचत करणे ◯  २) आराम करणे ◯  ३) खेळणे ◯  ४) मदत करणे ◯

**३) धूम पळणे –**

१) जोरात पळणे ◯  २) हळू हळू पळणे ◯  ३) उड्या मारत पळणे ◯  ४) पळणे ◯

**४) फिर फिर फिरणे –**

१) स्वत:भोवती फिरणे ◯  २) खूप फिरणे ◯  ३) लांब फिरणे ◯  ४) गोल गोल फिरणे ◯

**५) धडक मारणे –**

१) धक्का देणे ◯  २) ढकलणे ◯  ३) पडणे ◯  ४) धडधड करणे ◯





'क' या अक्षरापासून सुरु होणारी चित्रे शोधा व नावे लिहा.




रनिंगबोर्डचा वापर करावा.





* एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) आकांक्षा सुमन बरोबर कोठे फिरायला गेली?

२) कोणत्या झाडाला नुकतीच पालवी फुटली होती?

३) आकांक्षाने सुमनला काय दिले?

४) इवल्या हातांनी मुलगा काय करणार आहे?

५) आपण शाळेत झेंडावंदन केव्हा करतो?

* रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.

(निसर्ग, पक्षी, वडिलांबरोबर, प्रगतीचा शेते)

१) आकांक्षा ................. गावी आली होती.

२) आकांक्षा ................. बघ कसे उडतायत ते!

३) आकांक्षाला प्रत्यक्ष ................ पहायला मिळाला.

४) या हातांनी .............. पिकवू.

५) ................. हा प्रवास आता होय सुरु.

* कोण कोणास म्हणाले ते सांगा.

१) " आपण खुप मजा करु."

२) पक्षी बघ कसे उडतायत ते?

३) आकांक्षा, गप्प का झालीस गं!

४) ही सारी पुस्तक तुला बरं का!

* थोडक्यात उत्तरे लिहा.

१) आकांक्षाने रानात गेल्यावर काय काय पाहिले?

२) मुले देशासाठी काय काय करणार आहेत?

३) १५ ऑगस्टच्या दिवशी शाळेत कोणकोणते कार्यक्रम असतात?

* तोंडी

* तुम्ही रानात/जंगलात फिरायला गेल्यावर काय काय पाहिले?

* तुम्ही कोणकोणत्या गोष्टी ऐकल्या आहेत?

* तुम्ही १५ ऑगस्ट व २६ जानेवारीच्या दिवशी काय काय तयारी करता?

* प्रात्यक्षिक

* आपल्या राष्ट्रध्वजाचे चित्र काढा. व माहिती लिहा.

* तुम्ही ऐकलेल्या गोष्टीपैकी एक गोष्ट वर्गात सादर करा.





* वाचा

## * मोठ्ठं व्हायचंय!

कागदाच्या मिशा ओठावर चिकटवून चिनू कितीतरी वेळ आरशात पाहत होता. त्याने आजोबांना विचारलं, 'मला तुमच्यासारख्या मिशा केव्हा येणार?' आजोबा म्हणाले, ''मोठा झालास की येतील'' चिनूने टाचा उंच केल्या, हात उंच केले आणि म्हणाला, ''एवढा मोठा?'' चिनूला मोठ्ठं व्हायची झालेली घाई पाहून आजोबांना हसे आलं. त्यांनी खडूचा एक तुकडा घेतला आणि आरशाच्या वरच्या बाजूला भिंतीवर एक खूण केली. म्हणाले, ''इथे तुझं डोकं लागेल एवढा उंच झालास की येतील मिशा'' एवढी उंचावरची खूण पाहून चिनू जरा नाराज झाला. पण तो रोज आरशाला चिकटून उभा राही व आपण किती उंच झालो ते पाही.







## * ऐका व पुन्हा लिहा.

* डोंगरावर खूप झाडे आहेत.
* पक्षी आकाशात उंच उडतात.
* मी अजयला गोष्टीचे पुस्तक दिले.
* आपला झेंडा तीन रंगाचा आहे.
* मी देशाची सेवा करणार आहे.





* सूचना – शिक्षकांनी वरीलप्रमाणे वाक्याचा सराव घ्यावा.





* झेंडा चित्र काढा व रंगवा.



* सूचना – वहीचा वापर करणे.





* खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) आकांक्षा सुमनबरोबर फिरायला कोठे गेली होती ?

२) आकांक्षाने रानात काय पाहिले?

३) आकांक्षाने सुमनला काय दिले?

४) मुले कशासाठी लढणार आहेत?

५) मुले इवल्या हातांनी काय करणार आहेत?

* रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) गवतावरुन चालताना गवताचा मऊमऊ .......... पायाला झाला.

२) वडाच्या झाडाला नुकतीच ............ फुटली होती.

३) आकांक्षाला प्रत्यक्ष .......... पाहायला मिळाला.

४) घाम गाळूनी भूमी .............. करु.

५) ............... हा प्रवास आता होय सुरू.

* कोण ते लिहा.

१) शहरात शिकणारी -

२) आकांक्षाला रानात फिरायला नेणारी -

३) देशाचे रक्षण करणारे -

४) न्यायासाठी लढणारे -

* खालील शब्द वाचा व पुन्हा लिहा.

निर्भय, परंपरा, निसर्ग, इवली, पालवी, स्पर्श

* सूचना - वहीचा वापर करणे.





* जोड्या लावा.



नाताळ



स्वातंत्र्य दिन



ईद



बैलपोळा



दिवाळी





* खालील चित्र पाहून समानअर्थी शब्दांशी जोड्या लावा.




* सूचना – शिक्षकांनी वरीलप्रमाणे वाक्याचा सराव घ्यावा.






* चित्र पाहून नाव लिहा व समान अर्थ असणाऱ्या शब्दाशी जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| मोर | ------ | ------ | ------ |
| चांदोबा | भास्कर | मयूर | होडी |

* यांना आणखी काय म्हणतात?

मासा – मत्स्य

पाणी –

सुमन –

जंगल –





* एक सारखे अर्थ असणारे शब्द वाचा व लिहा.




* वाचा व लिहा.

| | | |
|---|---|---|
| जंगल – वन | पंख – पर | आई – माता |
| बाग – उद्यान | पक्षी – खग | गणपती – गणेश |
| जमीन – धरा | आकाश – नभ | पाऊस – वर्षा |

* वहीचा वापर करावा.



७

* पाच ते सात ओळीत माहिती लिहा.

## * माझी शाळा *



सूचना – कागदाचा वापर करावा.





## * वाचा, लिहा.

* फक्त पुस्तकी ज्ञान फायद्याचे नसते. तर अनुभवाने खूप गोष्टी शिकता येतात.

* पुस्तकांची काळजी घ्या. विनाकारण वह्यांची पाने फाडू नका, कागद वाया घालवू नका.

* मोठे होऊन आपण देशाचे नाव उज्ज्वल करु, आपण एक आदर्श नागरिक बनून देशाची प्रगती करु.

* सूचना – वहीचा वापर करावा.





* खालील शब्दाचे अर्थ वाचा समजून घ्या, पुन्हा लिहा.



## * आकांक्षाचं पुस्तक *

नवल – आश्चर्य.

पालवी – कोवळी पाने.

## * ध्वज उंच धरु *

इवल्या – छोट्याशा

स्मरणे – आठवणे.

भूमी – जमीन

ध्वज – झेंडा

निर्भय – न घाबरणारा

* सूचना – वहीचा वापर करावा.

ZP, Thane





## * ध्वज उंच धरु –

* आपल्या देशाचे नाव काय आहे?
* आपल्या देशाचा राष्ट्रध्वज किती रंगाचा आहे? कोणकोणते?
* आपल्या देशाचे रक्षण कोण करते?
* आपल्याला लागणारे अन्नधान्य कोण पिकवतो?
* आपल्या देशासाठी आपण काय करावे असे तुम्हाला वाटते?



* शिक्षकांसाठी सूचना – वरील प्रमाणे पूरक प्रश्नांचा सराव घेऊन कवितेस अनुरुप चर्चा घडवून आणावी.

ZP, Thane




# ध्वज उंच धरु











* सारांश –

मुलांच्या मनामध्ये देशाविषयी अभिमान व राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा प्रयत्न या कवितेतून करण्यात आला आहे. आपल्या देशाचा ध्वज इवल्या हातांनी ही मुले उंच धरणार आहेत. सैनिक होऊन ते देशाचे रक्षण करणार आहेत. तर सेवक होऊन देशाची सेवा करणार आहेत. या हातांनी खूप काम करुन शेत पिकवणार आहेत व झाडे लावून घाम गाळून भूमी हिरवीगार करणार आहेत. हे हात गरिबांचे अश्रू पुसतील तसेच न्यायासाठी निर्भयपणे लढतील असे कवितेतून सांगण्यात आले आहे.

* शिक्षकांसाठी सूचना – शिक्षकांनी चित्राच्या आधारे कवितेचा सारांश स्पष्ट करावा.





## * अभिनय करा.



१) नळ चालू करा.

२) पाण्याच्या साठवणुकीची भांडी स्वच्छ करा.



३) पाण्याच्या भांड्यातून पाणी घेणे

४) झाडांना पाणी घाला.



५) मिठाईवाला गिऱ्हाईकाला मिठाई देत आहे.

६) पाणी साठवणुकीच्या भांड्यात पाणी गाळून भरा.



७) जेवण सुरू करण्यापूर्वीची कृती करा.

८) स्वत: जेवणाच्या ताटात जेवण वाढून घ्या.

* सूचना – शिक्षकांनी वरीलप्रमाणे कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात.

* लक्षात ठेवा – परवानगी शिवाय इतरांच्या वस्तूंना हात लावू नये.





## * पुढील शब्दांना 'करी' जोडून पुन्हा लिहा.

१) शेत – शेतकरी

२) काम –

३) कष्ट –

४) वाट –

५) पहारा –

## * योग्य शब्द बनवा व लिहा.

१) स भ्या अ = अभ्यास

२) वा प्र स =

३) ती ज म ग ती म =

४) म अ रा प =

५) क चा ल =

## * रिकाम्या चौकटीत योग्य अक्षर लिहून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ☐ | मा | ल | ☐ | मा | ल |
| ☐ | मा | ल | ☐ | मा | ल |

* रनिंगबोर्डचा वापर करावा.





* वाचा

## * श्यामची गोष्ट *


शाम हा फार गुणी मुलगा होता. तो आईने सांगितलेली सर्व कामे ऐकत असे. एकदा श्यामची आई खूपच आजारी होती ती झोपून होती. वटपौर्णिमेला वडाच्या झाडाला १०८ फेऱ्या घालण्याचे व्रत श्यामची आई करत असे पण आजारी असल्यामुळे श्यामच्या आईला ते जमणार नव्हते. 'शाम, आज वटपौर्णिमा आहे माझ्याऐवजी वडाला तू १०८ फेऱ्या मार'. म्हणजे माझे व्रत पूर्ण होईल असे श्यामची आई शामला म्हणाली. त्यावर शाम म्हणाला हा तर स्त्रियांचा सण आहे. आणि मी फेऱ्या मारू लागलो तर सर्वजण मला हसतील. त्यावर श्यामची आई म्हणाली अरे बाळा कोणतेही काम करताना कमीपणा बाळगू नये. मुलांचे किंवा मुलींचे असे कोणतेच काम ठरलेले नसते. प्रत्येक काम हे श्रेष्ठच असते.







# * आकांक्षाचं पुस्तक



* तुम्ही सुट्टीत फिरायला कोठे जाता?
* फिरायला गेल्यावर तेथे काय काय करता?
* रानात फिरायला गेल्यावर आपल्याला काय काय दिसते?
* झाडावर किलबिलाट कोण करत असते?
* तुम्ही कोणकोणती फुले पाहिली आहेत?
* तुम्ही पाहिलेल्या पक्ष्यांची नावे सांगा ?
* तुम्ही तुमच्या मित्राला काय बक्षीस देता?

* शिक्षकांसाठी सूचना – वरीलप्रमाणे पूरक प्रश्नांचा सराव घेऊन पाठास अनुरूप चर्चा घडवून आणावी.



# वाढदिवसाची भेट







*** सारांश –**

निसर्गातील प्रत्यक्ष अनुभव या पाठातून मांडण्यात आले आहेत. आकांक्षा ही शहरात शिकणारी मुलगी सुट्टीत वडिलांबरोबर गावी जाते. बरोबर ती वाचण्यासाठी गोष्टीची पुस्तके नेते. गावाला गेल्यावर तिथे तिला सुमन भेटते सुमन आकांक्षाला रानात फिरायला नेते तेथे आकांक्षाला पुस्तकातील वर्णनाप्रमाणे निसर्गाचे चित्रण अनुभवास मिळते. पक्षी समोरुन भुईकन उडतात, वडाच्या झाडाला फुटलेली पालवी, गवताचा मऊमऊ स्पर्श, हे सगळे जवळून अनुभवयाला मिळते. आकांक्षाने पान, फुलं, पक्षी, रान हे पुस्तकात पाहिलं होते. अनुभवले मात्र नव्हते. याउलट सुमन ने हे सर्व अनुभवले होते. परंतु या गोष्टीची पुस्तके तिने पाहिली नव्हती. आकांक्षाने सारी गोष्टीची पुस्तके सुमनला दिली तर सुमन बरोबर पाहिलेल्या निर्सगातील गोष्टी ती मनात घेऊन गेली.

* सूचना – शिक्षकांनी चित्राच्या आधारे पाठाचा सारांश स्पष्ट करावा.